एच. डी. रेवण्णा यांच्या घराची झाडाझडती

बंगळूर : जेडीएसचे खासदार तथा उमेदवार प्रज्वल रेवण्णाच्या सेक्स स्कँडलची चौकशी करत असलेल्या एसआयटीने आणखी काही पुरावे मिळतात काय म्हणून प्रकरणातील दुसरे आरोपी तसेच प्रज्वलचे वडील एच. डी. रेवण्णा यांच्या घराची झाडाझडती घेतली.

प्राईम फोकस लिमिटेड

• सीआयएन : एल ९२१०० एम एच १९९७ पीएलसी १०८९८१
नोंदणीकृत कार्यालय : प्राईम फोकस हाऊस, लिंकिंग रोड, सिटी बँक समोर, खार (पश्चिम) मुंबई-४०००५२ • दूरध्वनी : ०२२ ६७१५ ५००० • फॅक्स : ०२२- ६७१५ ५००१
• संकेतस्थळ : www.primefocus.com • ई-मेल आयडी : ir.india@primefocus.com

टपाली मतदानाची सूचना

प्राईम फोकस लिमिटेड (**"कंपनी"**) च्या सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येते की कंपनी कायदा २०१३ कलम १०८ आणि कलम ११० च्या तरतुदींच्या अनुसार (यापुढे उल्लेख कायदा), तसेच त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा यांच्या अनुसार तसेच कायद्याच्या लागू असलेल्या अन्य तरतुदींच्या अनुसार आणि कंपनीज (मॅनेजमेंट अँड ऍडमिनिस्ट्रेशन) नियम २०१४ चा नियम २० आणि २२ (**"नियम"**) यांच्या अनुसार आणि त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुसार तसेच त्यासह वाचा सामान्य परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांकीत ०८ एप्रिल २०२०, सामान्य परिपत्रक क्रमांक १७/२०२० दिनांकीत १३ एप्रिल २०२०, तसेच त्यासह वाचा लागू असलेली अन्य परिपत्रके आणि अलीकडचे परिपत्रक क्रमांक ०९/ २०२३ दिनांकीत २५ सप्टेंबर २०२३ च्या अनुसार (**"संबंधित परिपत्रके"**) जी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (**"एमसीए"**) यांनी जारी केली आहेत तसेच सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) अधिनियम २०१५ (**"लिस्टिंग रेग्युलेशन्स"**) चा नियम ४४ आणि सामान्य सभांच्या संदर्भात इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया यांनी जारी केलेले सेक्रेटरिअल स्टँडर्ड्स २ (**"एसएस-२"**) आणि लागू असलेले अन्य कायदे आणि अधिनियम यांच्या अनुसार आणि ज्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांचा समावेश आहे, त्यांच्या अनुसार कंपनीने टपाली मतदान सूचना दिनांकीत २९ एप्रिल २०२४ तसेच त्यासह एक्सप्लेनेटरी स्टेटमेंट निर्गमित करण्याची प्रक्रिया दिनांक ०७ मे २०२४ रोजी पूर्ण केली आहे आणि ही प्रपत्रे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अशा सभासदांना निर्गमित करण्यात आली आहेत ज्या सभासदांचे ई-मेल तपशील कंपनी रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्स्फर एजंट्स म्हणजेच लिंक इन टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे तसेच डिपॉझिटरी/डिपॉझिटरी पार्टीसिपंटस यांच्याकडे मंगळवार दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी (**"कट ऑफ तारिख"** रोजी) नोंदणीकृत आहेत. टपाली मतदान सूचना, टपाली मतदान अर्ज यांची प्रत्यक्ष प्रत आणि प्री पेड बिझनेस रिप्लाय इन्व्हलप यांची प्रत्यक्ष प्रत सभासदांना पाठविण्याची आवश्यकता संबंधित परिपत्रकाच्या अनुसार निलंबित करण्यात आली आहे. दूरस्थ ई-मतदान पद्धतीने होणारी टपाली मतदान प्रक्रिया योग्य आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी याची छाननी करण्यासाठी छाननी अधिकारी म्हणून श्री मेहुल रावळ, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी (सभासद क्रमांक : एसीएस-१८३००, सीपी क्रमांक २४१७०) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या संदर्भात सर्व सभासदांना सूचित करण्यात येते की ;

१. टपाली मतदान सूचनेत नमूद करण्यात आलेल्या विशेष प्रस्तावांवर टपाली मतदानानाने केवळ इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीने (**"दूरस्थ ई-मतदान"**) कामकाज घेण्यात येणार आहे आणि दूरस्थ ई-मतदान सुविधा सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (**"सीडीएसएल"**) यांनी उपलब्ध करून दिली आहे.
२. दूरस्थ ई-मतदान कालावधीला बुधवार दिनांक ०८ मे २०२४ रोजी (भारतीय प्रमाण वेळेच्या अनुसार सकाळी ९.०० वाजता) प्रारंभ करण्यात येणार आहे आणि ही प्रक्रिया गुरुवार दिनांक ०६ जून २०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता (भारतीय प्रमाण वेळेच्या अनुसार) बंद करण्यात येईल. वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या कालावधीत सभासद मतदान करू शकतील. गुरुवार दिनांक ०६ जून २०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजल्यानंतर दूरस्थ ई-मतदान प्रारूप मतदानासाठी खंडित करण्यात येईल आणि वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या कालावधीच्या नंतर दूरस्थ ई-मतदानास परवानगी दिली जाणार नाही. दूरस्थ ई-मतदान पद्धतीने होणाऱ्या मतदान प्रक्रियेचा सविस्तर तपशील टपाली मतदान सूचनेत विस्ताराने देण्यात आला आहे. एखाद्या सभासदाने एकदा मतदानाचा हक्क बजावलेला असेल तर त्याला त्यात बदल करता येणार नाही. सभासदांचे मताधिकार हे कट ऑफ तारीख रोजी कंपनीच्या एकूण पेड अप समभाग भांडवलात सभासदांकडे असलेल्या समभागांच्या प्रमाणावर अवलंबून असतील.
३. केवळ असे सभासद ज्यांची नावे कंपनीच्या सभासद नोंद पुस्तिकेत तसेच डिपॉझिटरीज यांनी तयार केलेल्या लाभार्थी मालकांच्या यादीत कट ऑफ तारीख रोजी म्हणजेच मंगळवार दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी नोंदणीकृत असतील तेच सभासद टपाली मतदान सूचनेत नमूद करण्यात आलेल्या प्रस्तावांवर दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान करण्यासाठी पात्र असतील. अशी व्यक्ती जी कट ऑफ तारीख रोजी कंपनीची सभासद नाही त्यांनी ही सूचना केवळ माहितीसाठी आहे, असे समजावे.
४. ज्या सभासदांना टपाली मतदान सूचना प्राप्त झालेली नाही ते सभासद mt.helpdesk@linkintime.co.in / ir.india@primefocus.com येथे संपर्क साधू शकतात.
५. इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीने होणाऱ्या मतदानाच्या संदर्भात कोणत्याही शंका असतील तर सभासद श्री राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, (सीडीएसएल) सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाउंड, एन एम जोशी मार्ग, लोअर परळ, (पूर्व), मुंबई ४०० ०१३ येथे संपर्क साधू शकतात किंवा ई-मेलच्या माध्यमातून helpdesk.evoting@cdslindia.com येथे संपर्क साधू शकतात किंवा टोलफ्री क्रमांक १८०० २२ ५५ ३३ येथे संपर्क साधू शकतात.

टपाली मतदान सूचना कंपनीचे संकेतस्थळ www.primefocus.com येथे तसेच स्टॉक एक्स्चेंज संकेतस्थळ म्हणजेच बीएसई लिमिटेड यांचे संकेतस्थळ आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज इंडिया लिमिटेड यांचे संकेतस्थळ www.bseindia.com आणि www.nseindia.com येथे अनुक्रमे आणि सीडीएसएल यांचे संकेतस्थळ www.evotingindia.com येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ज्या सभासदांनी आपले ई-मेल तपशील नोंदणीकृत केलेले नाही त्यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी खालील पद्धतीने आपले ई-मेल तपशील नोंदणीकृत करून घ्यावेत.

१. प्रत्यक्ष समभागधारकांसाठी : कृपया आवश्यक तपशील जसे की फोलिओ क्रमांक, समभागधारकाचे नाव, समभाग प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत, (मागून आणि पुढून), पॅनकार्ड (पॅनकार्डची स्वयंसाक्षांकीत प्रत मागून आणि पुढून), आधार (आधारकार्डची स्वयंसाक्षांकीत प्रत) ई-मेलच्या माध्यमातून ir.india@primefocus.com / mt.helpdesk@linkintime.co.in येथे पाठवावी.
२. डिमॅट समभागधारकांसाठी : कृपया आपला इ मेल तपशील आणि मोबाईल क्रमांक आपल्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटस (डीपी) यांच्याकडे नोंदणीकृत करून घ्यावा.
३. वैयक्तिक डिमॅट समभागधारकांसाठी : कृपया आपला इ मेल तपशील आणि मोबाईल क्रमांक आपल्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटस (डीपी) यांच्याकडे अद्ययावत करून घ्यावा जे ई-मतदानासाठी आणि आभासी बैठकीत डिपॉझिटरीच्या माध्यमातून सहभागी होण्यासाठी आवश्यक आहे.

प्रस्ताव, जर संमत झाल्यास ते ई-मतदानाची शेवटची तारीख म्हणजेच गुरुवार दिनांक ०६ जून २०२४ रोजी संमत झाले असे समजण्यात येईल. टपाली मतदानाचे निकाल शनिवार दिनांक ०८ जून २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी घोषित करण्यात येतील आणि ते छाननी अधिकारी यांच्या अहवालासह कंपनीचे संकेतस्थळ www.primefocus.com येथे प्रकाशित करण्यात येतील आणि त्यांची माहिती बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड तसेच सीडीएसएल यांना कळविण्यात येईल.

प्राईम फोकस लिमिटेड यांच्याकरिता
स्वाक्षरी/-
परीना शाह
कंपनी सेक्रेटरी आणि कम्प्लायन्स अधिकारी
एसीएस १८०६१

स्थळ : मुंबई
दिनांक : ०७ मे, २०२४

'छत्रपती'च्या भूमीतून शिवाजीरावांना लाखोंच्या मताधिक्क्याने निवडून द्या

न्हावरे येथील प्रचंड जाहीर सभेत भाजपा गटनेते दरेकरांचे शिरूरवासीयांना आवाहन

शिरूर : जय मल्हार क्रांती संघटनेतर्फे शिरूरच्या न्हावरे येथे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहिर सभेत बोलताना भाजपचे गटनेते आ. प्रवीण दरेकर, व्यासपिठावर आढळराव पाटील यांच्यासह अन्य मान्यवर. समोर उपस्थित प्रचंड जनसमुदाय.

शिरूर : पुढारी वृत्तसेवा

नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करायचे असेल तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पावन भूमीतून शिवाजीराव आढळराव पाटील यांना लाखोंच्या मताधिक्क्याने निवडून द्या असे आवाहन भाजपाचे विधानपरिषदेतील गटनेते आणि शिरूर लोकसभेचे निरीक्षक आमदार प्रविण दरेकर यांनी शिरूरवासियांना केले.

जय मल्हार क्रांती संघटनेतर्फे शिरूरच्या न्हावरे येथे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत दरेकर बोलत होते. याप्रसंगी आढळराव पाटील, जय मल्हार क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दौलत नाना शितोळे, रवी बाप्पू काळे, मंगलदास अप्पा बांदल, नाथाभाऊ शेवाळे, शरदभाऊ कालेवर, राहुलदादा पाचर्णे, राजू कोरेकर, आबासाहेब सानवणे, एकनाथ शेलार यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांच्यावर तोफ डागत दरेकर म्हणाले की, अभिनेत्यात आणि नेत्यात फरक आहे. अमोल कोल्हे अभिनेता आहे. शिवाजीराव आढळराव आमचे नेता, कार्यकर्ता आहेत. एकवेळ अभिनेता चांगल्या प्रकारचा अभिनय करू शकतो परंतु चांगल्या प्रकारचे विकासकाम करू शकत नाही. त्याकरिता हाडाचा कार्यकर्ता, नेता लागतो. लोकांसाठी पाच वर्षात आपण नेमके काय केले? पाच वर्षाच्या काळात कुठल्याही गावात संपर्क नाही, कवडीचा निधी नाही, कोल्हेंचा ८० टक्के निधी परत गेला. हे तुमचे कर्तृत्व! निष्क्रिय खासदार म्हणून आपला शो फ्लॉप झाल्यानंतर पुन्हा लोकांसमोर यायचे धाडस कसे होते, असा सवालही दरेकर यांनी केला.

शिवाजीराव आढळराव यांनी उद्योग क्षेत्रात स्वतःचे नाव कमावले. त्यासोबत या मातीशी माझी नाळ जोडलेली आहे, जन्म देणाऱ्या मातीचे पांग फेडायचे आहेत, या भूमिकेतून २० वर्षांपूर्वी त्यांनी जनतेसाठी स्वतः झोकून दिले. १५ वर्ष आढळराव यांनी प्रामाणिकपणे कामं केले हे आज जनताच बोलून दाखवत आहे. तुमची १५ वर्षाची कारकीर्द आणि कोल्हेंचे ५ वर्षाचे ढोंग जनतेला नीट कळतेय. रेकॉर्डब्रेक मतदानाने तुम्ही निवडून येणार आहात, असा विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला. दरेकर पुढे म्हणाले की, अमोल कोल्हे यांना कशासाठी आणि का मतदान करायचे? निधी कुठून आणणार? असे सवाल करून दरेकर म्हणाले, देशात नरेंद्र मोदींचे आणि राज्यात शिंदे, फडणवीस आणि अजित पवारांच्या नेतृत्वात सरकार आहे. केंद्राकडून निधी आणि राज्य सरकारकडून पाठबळ हवे असेल तर आपल्याला शिवाजीराव यांच्याशिवाय पर्याय नाही. ही निवडणूक देशाची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षात जी कामे केली त्यावर कळस लावायचा असेल तर 'अब की बार ४०० पार' हे उद्दीष्ट गाठावले लागेल. या ४०० पार खासदारांमध्ये छत्रपती शिवरायांना ज्या मातीने जन्माला घातले त्या मातीतला शिवाजी असायला हवा, असेही दरेकरांनी म्हटले.

बहुजन समाजाला निधीही दिला

गेली १० वर्ष जय म्हल्हार संघटना रामोशी समाज, बेरड, धनगर, मातंग, ओबीसी समाज असेल या सर्वांच्या आयुष्यात बदल व्हावा यासाठी प्रामाणिकपणे काम करत आहे. बहुजन समाजाच्या नावे मते मागायची पण त्यांचा उत्कर्ष होईल यासाठी तथाकथित जाणत्या राजाने काही केले नाही. ही लोकं म्हणजे मतांची फॅक्टरी एवढेच पाहिले, असा टोला दरेकरांनी शरद पवार यांचे नाव न घेता लगावला. बेडर समाजासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ आम्ही स्थापन केले व आवश्यक निधीची तरतूदही सरकारने केली. मराठा समाजाला आरक्षण देण्याचे कामही याच शिंदे सरकारने केल्याचे दरेकरांनी सांगितले.

घोडगंगेत काय घोडे मारले ते उघड करणार

● इथला घोडगंगा सहकारी साखर कारखाना बंद पडला, हे कोल्हेंच्या पक्षाच्या आमदाराचे कर्तृत्व शेतकऱ्यांच्या कष्टावर हा कारखाना उभा राहिला. मल्लिकार्जुन देवस्थानाची शंभर-सव्वाशे एकराची जागा त्या कारखान्याला दिली. त्यावेळी सांगितले होते मल्लिकार्जुन नाव आम्ही कारखान्याला देऊ. ते तर दिले नाही, उलट कारखान्याला स्वतःच्या वडिलांचे नाव दिले. जे देवाला फसवतात ते जनतेसाठी काय काम करणार? व्यंकटेश्वर तुमचा खासगी कारखाना, तो चालला. त्यावर असलेले कर्ज फेडले आणि सहकारातून चालू झालेला घोडगंगा सहकारी कारखाना मात्र बंद ठेवलात. या १५ किमी मध्ये प्रचंड प्रमाणात ऊस असताना तुमचा खासगी कारखाना चालू ठेवला. सर्वसामान्यांचा घोडगंगा बंद झाला. निवडणुकीनंतर याचा हिशोब तुम्हाला चुकवावा लागेल. घोडगंगेत काय घोडे मारले ते शिरूरवासियांसमोर उघड केल्याशिवाय आम्ही राहणार नाही, असा इशाराच दरेकरांनी यावेळी विरोधकांना दिला. घोडगंगा साखर कारखान्याला पुन्हा सुगीचे दिवस आणू असे आश्वासनही त्यांनी दिले.

शिवसेनेचे खासदार राजेंद्र गावित पुन्हा भाजपात

मुंबई : खासदार राजेंद्र गावित यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

शिवसेनेचे पालघरचे खासदार राजेंद्र गावित यांनी भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे आदींच्या उपस्थितीत मुंबईमध्ये भाजपात पुनर्प्रवेश केला.

काँग्रेस पाकिस्तान धार्जिणी वक्तव्ये करीत असताना, त्यांचे पार्टनर उद्धव ठाकरे तोंड बंद करून बसले आहेत. मतांच्या लांगूलचालनासाठी ते गप्प आहेत का, असा प्रश्न करतानाच मतांकरिता ते लाचार झाले आहेत, अशा शब्दात फडणवीस यांनी यावेळी हल्लाबोल केला. तसेच हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी उज्ज्वल निकम यांचे अभिनंद केले होते, त्यांच्या कार्याचे कौतुक केले होते, अशी आठवणही त्यांनी करुन दिली. २६/११ हल्ल्यात हुतात्मा झालेले पोलिस अधिकारी हेमंत करकरे यांना दहशतवादी अजमल कसाबने गोळ्या घातल्या नाहीत, तर 'आरएसएस'शी निष्ठा असलेल्या एका पोलीस अधिकाऱ्याने गोळ्या झाडल्या होत्या आणि विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी ही बाब न्यायालयापासून लपवून ठेवल्याचा दावा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला होता. तसेच कांग्रेस नेते शशी थरूर यानीही निकम यांच्यावर जे आरोप केले आहेत, त्याची चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. त्याचा समाचार फडणवीस यांनी घेतला.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

SRA/CO/OW/ २०२४/ २४०७८
दिनांक : ०६/ ०५/ २०२४

– ऑनलाईन पध्दतीने सदनिका वाटपाची नोटीस –

मातोश्री व इतर १४ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., न.भू.क्र. ४२६(पै), ४३२(पै), ४३७(पै), ४४०(पै), ६४५ ते ६५०, ६५३(पै), ६५४(पै), ६५५(पै), ६५८(पै), ६५९(पै), ८५४, ८६९, ८७०, ८७१ व दादर नायगाव डिव्हीजन, न.भु.क्र. १५५(पै), १७४(पै), १७६(पै), २/ १७७(पै), १८५(पै), १०३८, १०३९, मुंबई -४०००१२. या भुखंडावरील पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांना कळविण्यात येते की, प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १६२/ दिनांक २३.१०.२०१५ व अंशत: बदल आदेश दिनांक ३०.०६.२०२० नुसार संस्थेतील **एकुण ११७** पात्र झोपडीधारकांना पुनर्वसन इमारत मधील निवासी सदनिकांचे सोडत पध्दतीने वाटप करण्यासाठी मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर, झोपुप्रा, मुंबई यांचे दि. ०६/०५/२०२४ रोजी माझी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. त्यानुसार निवासी झोपडीधारकांची यादी पुनर्वसन योजनेच्या भुखंडावर नोटिशीसोबत प्रसिध्द करण्यात येत आहे. वाटप यादीमधील झोपडीधारकांच्या नावाबाबत सुचना व हरकती असल्यास त्यांनी **दि. ११.०५.२०२४** पर्यंत प्राधिकरणाच्या खालील नमुद **ईमेल** (sravcmumbai@gmail.com) आयडीवर सादर कराव्यात. ईमेल आयडीवर प्राप्त झालेल्या सुचना व हरकती विचारात घेऊन **सदनिका वाटप सोडतीचा कार्यक्रम दिनांक १५.०५.२०२४ रोजी ठिक दुपारी १२.३० वाजता** प्राधिकरणाच्या कार्यालयात **लॉटरी अलॉटमेंट पोर्टल सर्व्हर वर ऑनलाईन पध्दतीने झूम ॲप (Zoom App) वर** आयोजित केलेली आहे. प्रसिध्द केलेल्या यादीनुसार पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना **झूम ॲप (Zoom App) वर सोडतीद्वारे निवासी सदनिकांचे वाटप करण्यात येणार आहे.** त्यानुसार सोडतीच्या दहा मिनिट अगोदर खाली दिलेल्या लिंकवर विहित तारखेस व वेळेस लॉटरी प्रक्रियेत सहभाग घेण्यात यावा.

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १६२/ दि. २३.१०.२०१५ व ऑनलाईन पध्दतीने लॉटरी घेणेकामी अंशत: बदल आदेश दिनांक ३०.०६.२०२० नुसार ऑनलाईन झूम ॲप (Zoom App) वर सोडत पध्दतीने पुनर्वसन योजनेतील एकुण ११७ निवासी सदनिकांचे वाटप करणे.

झूम ॲप (Zoom App) वरील लिंक : https://us02web.zoom.us/j/4759864543?pwd=eFFsQ25paHQ5czhDWVNoWSs3N250dz09
Meeting ID : 881 9203 5308
Passcode : 123456

सही/ -
(विरधवल जाधव)
प्राधिकृत अधिकारी तथा
सहकारी अधिकारी श्रेणी-२, झो.पु.प्रा., मुंबई

टिप :
१) सोडतीसाठी पात्र (पती/पत्नी) झोपडीधारकांनीच ऑनलाईन लॉटरीमध्ये विहीत वेळेत व तारखेस सहभागी व्हावे.
२) सोडतीच्या वेळी ज्या झोपडीधारकांचे नाव परिशिष्ट-२ मध्ये पात्र आहेत अशा व्यक्ती अंध, अपंग, विधवा महिला कुटुंब प्रमुख यांनी पुनर्वसन इमारतीमधील खालच्या मजल्यावरील सदनिकांची प्राधिकरणाच्या **sravcmumbai@gmail.com** या इमेल आयडीवर दिनांक ११.०५.२०२४ पर्यंत लेखी पत्राने मागणी केल्यास परिपत्रकातील तरतुदीनुसार सदनिका वाटप करण्यात येईल. सदर गटातील व्यक्तींनी ईमेल आयडीवर शासनमान्य अंध-अपंग, याबाबतचा पुरावा दाखला सादर करणे आवश्यक आहे. तसेच विधवा झोपडीधारकांनी पतीचा मृत्यु दाखला सदर अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
३) ज्या झोपडीधारकांना परिशिष्ट-२ मध्ये झोपडी ओळखपत्र शुल्क, नुकसान भरपाई व हस्तांतरण शुल्क भरणा करणेबाबत नमुद केलेले आहे, अशा झोपडीधारकांना सदर वाटपावेळी सदनिका वाटप करण्यात येईल. परंतु त्यांनी परिशिष्ट-२ मधील नमुद शुल्क भरणा केले नंतर सदनिका वाटपपत्र देण्यात येईल.

कोल्हापूर, हातकणंगलेतील उमेदवारांचे मतदान

शाहू महाराज

खा. संजय मंडलिक.

राजू शेट्टी

धैर्यशील माने.

सत्यजित पाटील-सरूडकर

डी. सी. पाटील.

वसुली व विक्री अधिकारी

दि ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशन लि.
महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० कलम १५६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम क्र. १०७ (३) १०१,१०३ विलासिनी, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या समोर, शिवाजी पथ, ठाणे (प) - ४००६०१
दूरध्वनी क्र. ९३२०३३२२८६

दवंडी

वसंत पारिजात को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., वसंत विहार, पोखरण रोड नं. २, ठाणे (पश्चिम) ता. ठाणे, जि. ठाणे. या सोसायटीचे थकबाकीदार सभासद श्री. दिपांकर सरकार यांचा सोसायटीमधील सदनिका क्रमांक बी/०१-३०४ याची विक्री जाहीर लिलावाने दिनांक २१/०५/२०२४ मंगळवार रोजी सकाळी १२.३० वाजता सोसायटी आवारात होणार आहे. तरी कोणाला लिलावात भाग घ्यावयाचा असेल अशा इच्छुक नागरीकांनी विशेष वसुली अधिकारी (दूरध्वनी क्रमांक ०२२-२५३३२२८६ किंवा ०२२-२५३६३२७७) यांच्याशी दिनांक २०/०५/२०२४ पूर्वी संपर्क करून लिलावाच्या शर्ती व अटीनुसार लिलावात भाग घ्यावा.

शिक्का

श्री. मनोज य. देवरे
विशेष वसुली व विक्री अधिकारी
दि ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑप. हौसिंग फेडरेशन लि.
१०१, १०३, विलासिनी, शिवाजी पथ, ठाणे (प.) - ४००६०१.

वसुली व विक्री अधिकारी

दि ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशन लि.
महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० कलम १५६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम क्र. १०७ (३) १०१,१०३ विलासिनी, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या समोर, शिवाजी पथ, ठाणे (प.) ४००६०१
दूर. क्र.९३२०३३२२८६

जाहीर लिलाव

सोसायटीचे खालील थकबाकीदार सभासदांकडील थकबाकी वसुलीसाठी त्यांच्या नावापुढे नमूद केलेल्या स्थावर मिळकतीची जाहीर लिलावाने विक्री केली जाणार आहे. तरी या लिलावात भाग घेऊन बोली बोलावयाची असेल त्यांनी दिनांक :- २१/०५/२०२४ मंगळवार रोजी दुपारी १२.३० वाजता लिलावाच्या ठिकाणी वसंत पारिजात को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., वसंत विहार, पोखरण रोड नं. २, ठाणे (पश्चिम) ता. ठाणे, जि. ठाणे. येथे हजर रहावे.

अ. क्र.	थकबाकीदाराचे नाव	स्थावर संपत्तीचे वर्णन	मंजूर वाजवी किंमत	थकबाकी रुपये
१	श्री. दिपांकर सरकार	सदनिका क्रमांक बी/०१-४०३ वसंत पारिजात को-ऑप.हौ. सोसायटी लि., वसंत विहार, पोखरण रोड नं. ०२, ठाणे (पश्चिम) क्षेत्रफळ ५०८ चौ.फूट	रु. ६८,०७,२००/- (अडुसष्ट लाख सात हजार दोनशे मात्र)	उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे शहर, ठाणे यांचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये व सुधारीत अध्यादेश अन्वये कलम १५४ बी २९ आदेश दिनांक ०१/१०/२०१९ रोजी रुपये ३,५४,९६६/- अधिक व्याज व इतर खर्च.

टिप : १) लिलावाच्या अटी व शर्ती लिलावापूर्वी वाचून दाखवण्यात येतील त्या लिलावात भाग घेणाऱ्यांवर बंधनकारक राहतील.
२) वरील वर्णन केलेली जंगम मालमत्ता जशी आहे तशी या तत्वावर विकण्यात येईल.
३) लिलावापूर्वी थकबाकीदार यांनी संपूर्ण रक्कम भरल्यास लिलाव रद्द केला जाईल.
४) लिलावात भाग घेण्यासाठी ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑप. हौसिंग फेडरेशन लि., ठाणे यांच्याकडे रुपये ५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख मात्र) दिनांक :- २०/०५/२०२४ दुपारी ५.०० वाजेपर्यत डी.डी द्वारे बोली लावणाऱ्यांनी अनामत रक्कम भरावी लागेल.
५) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदविल्या जाणार नाहीत.
६) बोलीमधील किमान फरक किती असेल हे लिलाव सुरु होण्यापूर्वी वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
७) सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे वसुली व विक्री अधिकारी यांचे मर्जीवर राहील.
८) ज्याचे नावे लिलाव पूर्ण करण्यात येईल त्यांने वसुली व विक्री अधिकाऱ्यांकडे बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम ताबडतोब भरली पाहिजे. तसे करण्यात कसूर केल्यास उक्त जंगम मालमत्ता ताबडतोब फेर लिलावास काढली जाईल.
९) ज्याचे नावे लिलाव पूर्ण करण्यात येईल त्याने वसुली व विक्री अधिकाऱ्यांकडे बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलाव विक्रीच्या तारखेपासून आठ दिवसांत भरली पाहीजे. तोपर्यंत जंगममालाचा कोणताही भाग खरेदीदार घेऊन जाऊ शकणार नाही.
१०) नियमाप्रमाणे रक्कम भरण्यात खरेदीदाराने कसूर केल्यास त्याने भरलेल्या अनामत रक्कमेतून २५ टक्के रक्कम विक्री खर्च वजा जाता राहिलेली रक्कम महाराष्ट्र शासनाचे कोषागारात योग्य शीर्षकाखाली भरण्यात येईल आणि खरेदीदाराचा त्या रक्कमेवरील जंगम मालावर हक्क संपुष्टात येईल.
११) खरेदीदाराने कसूर केल्यास, फेर लिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा फेर लिलावाचे वेळी दुसऱ्या खरेदीदाराने बोली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून (कसूर करणाऱ्यांकडून) वसूल केली जाईल.
१२) पहिल्या विक्रीपेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त आल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त आलेल्या किंमतीवर हक्क राहणार नाही.
१३) उक्त जंगम मालमत्तेवरील कर विमा इत्यादीची थकबाकी व नंतर देय होणारे कर/विमा इत्यादी खरेदीदारानेच भरावयाचा आहे.
१४) थकबाकीदाराने लिलाव उद्घोषणेप्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्रि अधिकाऱ्याकडे भरल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करण्याचा, नियमाप्रमाणे विचार करतील आणि लिलाव रद्द केला जाईल.
१५) उपरोक्त कलमाप्रमाणे लिलाव रद्द झाल्यास खरेदीदाराने भरलेली १५ टक्के अनामत रक्कम व बोलीच्या ५ टक्के रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.

दिनांक :- ०६/०५/२०२४
ठिकाण : ठाणे (पश्चिम)

शिक्का

सही/-
श्री. मनोज य. देवरे
विशेष वसुली व विक्री अधिकारी
दि ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑप. हौसिंग फेडरेशन लि.
१०१, १०३ विलासिनी, शिवाजी पथ, ठाणे (प) - ४००६०१.

बंगालमधील २५ हजार शिक्षक भरती रद्द करण्यास सुप्रीम कोर्टाची स्थगिती

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

पश्चिम बंगालमधील २५ हजार ७५३ शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करण्याच्या कोलकाता उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देत दिलासा दिला आहे. सरन्